ePaper
26 मतदारसंघांत 'शिवसेना विरुद्ध शिवसेना' सामना रंगणार!
| वर्ष - 8 | अंक -106 | UDYAM-MH-26-0158827 |




महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- अश्विनच्या जागी वॉशिंग्टनला संधी
- अय्यर दुखापतीच्या चर्चांवर भडकला
- सोनम वांगचूक यांचे उपोषण मागे
- पर्यावरण कायदा दंतहीन!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 24 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## ठाकरे-शिंदेंकडून उमेदवारांच्या पहिल्या याद्या जाहीर 26 मतदारसंघांत

# 'शिवसेना विरुद्ध शिवसेना' सामना रंगणार!

## अनेक नव्या आणि जुन्या चेहऱ्यांना संधी

**। मुंबई । महाईन्यूज**

**महाविकास आघाडीचा जागावाटपाचा तिढा सुटल्याचं मविआच्या प्रमुख नेत्यांनी बुधवारी (२३ ऑक्टोबर) पत्रकार परिषद घेऊन जाहीर केलं. त्याचदरम्यान, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने विधानसभा निवडणुकीतील त्यांच्या पक्षाच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पहिल्या यादीद्वारे त्यांनी ६५ उमेदवार जाहीर केले आहेत. अनेक नव्या आणि जुन्या चेहऱ्यांना यामिनित्ताने त्यांनी संधी दिली आहे.**




तसेच काँग्रेसच्या काही मतदारसंघांमध्ये उद्धव ठाकरेंच्या पक्षाने उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दुसऱ्या बाजूला, उद्धव ठाकरेंच्या एक दिवस आधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. एकनाथ शिंदे यांनी ४५ जागांवरील त्यांचे उमेदवार जाहीर केले होते.

जून २०२२ मध्ये शिवसेना पक्ष फुटून दोन नवे पक्ष तयार झाले. या दोन पक्षांचा राज्याच्या राजकारणात मोठा संघर्ष चालू आहे. अशातच कोणकोणत्या मतदासंघांमध्ये शिवसेना (ठाकरे) विरुद्ध शिवसेना (शिंदे) असा सामना रंगणार? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. आतापर्यंत दोन्ही पक्षांनी जाहीर केलेल्या उमेदवारांच्या याद्यांनुसार सध्या तरी राज्यातील २६ मतदारसंघांमध्ये हे दोन पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. यामध्ये खुद्द मुख्यमंत्र्यांचा कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघ, जोगेश्वरी पूर्व, माहिम, महाड, राधानगरीसारख्या मतदारसंघांचा समावेश आहे.

निलेश राणे धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढवणार!

दरम्यान, महायुतीच्या जागावाटपात कुडाळची जागा शिवसेनेच्या शिंदे गटाला मिळाल्यानंतर भाजपा नेते निलेश राणे यांनी शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला आहे. तब्बल दोन दशकांनंतर राणे कुटुंबातील सदस्य शिवसेनेत परतला असून निलेश राणे हे धनुष्यबाण या चिन्हावर आगामी विधानसभा निवडणूक लढवतील.

### मराठवाड्यातील उमेदवार वादाच्या रिंगणात

शिवसेनेतील फूटीनंतर मराठवाड्यातून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणाऱ्या नऊ आमदारांसह माजी मंत्री अर्जून खोतकर आणि खासदार संदीपान भुमरे यांचे चिरंजीव विलास भुमरे यांना शिवसेनेने उमेदवारी दिली. यातील नांदेडचे बालाजी कल्याणकर, ज्ञानराज चौगुले, प्रा. रमेश बोरनारे, वगळता बहुतांश उमेदवार वादाच्या रिंगणात उभे आहेत. मात्र, या वादांचा निवडणुकांवर काही एक परिणाम होणार नाही, असा दावा शिवसेनेच्या वतीने केला जातो. मराठवाड्यातील मंत्री अब्दुल सत्तार, तानाजी सावंत यांच्यासह आमदार संतोष बांगर ही नावे तर सतत वादात होती. आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे आपल्या पहिल्या वक्तव्यापासून ते कार्यशैलीमुळे सतत चर्चेत होते. 'कोण तो हाफकिन?, त्याच्याकडून औषध घेणे बंद करा' असे ते म्हणाले होते. हाफकिन हा माणूस महाराष्ट्रात राहतो आणि त्याला आपल्याला सूचना देता येतात, असा त्यांचा समज असल्याचे चित्र माध्यमांमधून प्रस्तुत झाले होते. मात्र, त्यावर खुलासा करत 'माझी शैक्षणिक आर्हता माध्यमांनी तपासावी. हे सरकार आल्याचे माध्यमांना रूचले नाही. म्हणून त्यांनी त्यांनी हे वक्तव्य पसरविले,' असा त्यांचा खुलासा होता. 'अजित पवार यांच्या शेजारी बसताना उलटी व्हायला होते', असेही ते अलिकडेच म्हणाल्याने वाद झाले होते. एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व पुढे यावे म्हणून देवेंद्र फडणवीस यांना शिवसेना फोडण्यासाठी मदत केल्याचे जाहीरपणे सावंत यांनी केलेले वक्तव्य गाजले होते. सतत वादाच्या रिंगणातील तानाजी सावंत आता पुन्हा परंडा मतदारसंघातून निवडणुकीत उभारणार आहेत.

## पिंपरीत आमदार आण्णा बनसोडे समर्थकांकडून जल्लोष

## महायुतीची उमेदवारी जाहीर : कार्यकर्त्यांनी फटाके फोडून पेढे वाढले

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. कालपर्यंत पक्षांतर्गत तसेच महायुतीतून होत असलेला तीव्र विरोध डावलून अजित पवार यांनी अण्णा बनसोडे यांना ही उमेदवारी दिली आहे. बनसोडे यांची उमेदवारी जाहीर होतात



पिंपरीतील त्यांच्या कार्यालजवळ कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. फटाके वाजवत तसेच पेढे भरवत समर्थकांनी मोठा जल्लोष केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल हे देखील उपस्थित होते. पिंपरी विधानसभेतून विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांना उमेदवारी दिल्यास आम्ही काम करणार नाही अशी भूमिका महायुतीतील इच्छुकांनी घेतली होती.

### महायुतीतील इच्छुकांची नाराजी दूर करणार?

काल तशी बैठक घेत काम न करण्याची शपथ देखील घेतली होती. मात्र त्यांचा विरोध असताना देखील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी अण्णा बनसोडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. आता अजित पवार यांच्यासह अण्णा बनसोडे विरोध करणाऱ्या महायुतीतील इच्छुकांची नाराजी दूर करणार की यात कोणी बंडखोरी करणार हे पाहणं देखील तितकेच महत्वाचं ठरणार आहे.

# अजित पवार गटाच्या बापू भेगडे यांची बंडखोरी!

## आमदार सुनील शेळके विरुद्ध बापू भेगडे अशी लढत

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील मावळ विधानसभा मतदारसंघात महायुतीत बंडखोरी झाली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बापू भेगडे यांनी प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा देत अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. तशी माहिती त्यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली आहे.**




त्यामुळे मावळ विधानसभा मतदारसंघात आमदार सुनील शेळके विरुद्ध बापू भेगडे अशी लढत पाहायला मिळणार आहे. महायुती मध्ये मावळ विधानसभा मतदारसंघावरून रस्सीखेच सुरू होती. अखेर आज विद्यमान आमदार सुनील शेळके यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांच्याच पक्षातील बापू भेगडे यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा स्थापनेपासून सदस्य आहे. मोठ्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली मी तयार झालो. माझं कुटुंब एकनिष्ठ काम करत राहिलं. परंतु, मला अजित पवारांनी मावळ मधून उमेदवारी दिली नाही. विद्यमान आमदार सुनील शेळके यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे मला खूप दुख झालं अशी खदखद बापू भेगडे यांनी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा देत असल्याचं म्हणत राष्ट्रवादीला राम- राम ठोकला आहे. त्यामुळे मावळ विधानसभा मतदारसंघात सुनील शेळके विरुद्ध बापू भेगडे अशी लढत होणार आहे निश्चित. मावळ विधानसभा मतदारसंघात महायुतीतून बंडखोरी निश्चित मानली जात आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बापू भेगडे यांनी पक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांनी देखील पक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. बापू भेगडे यांना पाठिंबा दिला आहे. आम्ही विद्यमान आमदार सुनील शेळके यांचं काम करणार नाहीत, असा ठराव आजच्या बैठकीत झाला आहे, अशी माहिती माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली आहे. पक्षश्रेष्ठींचा फोन किंवा आदेश आल्यास आम्ही त्यांची माफी मागणार असून आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम राहणार आहोत. असं देखील बाळा भेगडे यांनी अधोरेखित केल आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाने आमदार सुनील शेळके यांना उमेदवारी दिल्यानंतर बापू भेगडे यांनी अपक्ष लढण्याचे जाहीर केल्यानंतर आता भाजपची भूमिका समोर आली आहे. भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडेंसह मावळमधील सर्व पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले.

### मावळमध्ये महायुतीत फूट

छातीवर दगड ठेवून निर्णय घेत आहे. जनसंघापासून आम्ही भाजपचे काम करतो. गेल्या पाच वर्षापासून कार्यकर्त्याला राजकारणातून संपून टाकण्याची भाषा केली. खच्चीकरण केले. राष्ट्रवादीचे उमेदवार म्हणून शेळके यांची उमेदवारी जाहीर झाली. त्यामुळे पक्षाच्या पदाचा राजीनामा देऊन आम्ही बापू भेगडे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.आम्ही निवडणूक जिंकणारच आहोत. पक्षाने माझ्यासारख्या कार्यकर्त्याला एवढा मोठा केले. तीनदा उमेदवारी दिली. आमदार, मंत्री केले. पण, मावळमध्ये पक्ष कार्यकर्ता वाचविण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची माफी मागून निर्णय घेत आहे.

# ‘रिपाइं’ला जागा देण्याची मागणी

## जागा न मिळाल्यास प्रचारात सहभागी न होण्याचा इशारा

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्ष महायुतीमधील अन्य घटक पक्षांबरोबर जागांची वाटाघाटी करत आहे. मात्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले- रिपाइं ) एकही जागा न देण्याची भूमिका भाजपने घेतली आहे. त्यामुळे महायुतीमध्ये जागा द्याव्यात, अशी आग्रही मागणी रिपाइंकडून करण्यात आली आहे.**



विधानसभा निवडणुकीत जागा न दिल्यास महायुतीच्या प्रचारात सहभागी होणार नाही, असा इशाराही रिपाइंच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आला.आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपाइंची भूमिका शहराध्यक्ष संजय सोनावणे, उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी स्पष्ट केली. माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, अॅड. मंदार जोशी, अशोक कांबळे, श्याम सदाफुले, महेंद्र कांबळे यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. रिपाइंने मुंबईतील चेंबर, धारावी, अहमदनगरमधील श्रीरामपूर, उत्तर नागपूर, यवतमाळ मधील डमर-खेड, नांदेडमधील देगल्लूर, पुण्यातील पिंपरी-चिंचवड आणि पुणे कॅन्टोन्मेंट या विधानसभा मतदारसंघाची मागणी केली आहे. लोकसभा निवडणुकीत रिपाइंने मतदारसंघात पूर्ण ताकदीने काम केले. त्यामुळे पुण्यातील वडगावशेरी किंवा पुणे कॅन्टोन्मेंटपैकी एक जागा सोडावी, अशी आग्रही मागणी आहे, असे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.जागा वाटपाचा तिढा सुटत नाही तोपर्यंत, रिपाइंचे कार्यकर्ते महायुतीच्या प्रचारात सहभागी होणार नाहीत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानंतरच प्रचारात सहभागी होण्याचा निर्णय घेतला जाईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.भारतीय जनता पक्ष महायुतीमधील अन्य घटक पक्षांबरोबर जागांची वाटाघाटी करत आहे. मात्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले- रिपाइं ) एकही जागा न देण्याची भूमिका भाजपने घेतली आहे. त्यामुळे महायुतीमध्ये जागा द्याव्यात, अशी आग्रही मागणी रिपाइंकडून करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीत जागा न दिल्यास महायुतीच्या प्रचारात सहभागी होणार नाही, असा इशाराही रिपाइंच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आला.महेंद्र पुण्यातील पिंपरी-चिंचवड आणि पुणे कॅन्टोन्मेंट या विधानसभा मतदारसंघाची मागणी केली आहे. लोकसभा निवडणुकीत रिपाइंने मतदारसंघात पूर्ण ताकदीने काम केले. त्यामुळे पुण्यातील वडगावशेरी किंवा पुणे कॅन्टोन्मेंटपैकी एक जागा सोडावी, अशी आग्रही मागणी आहे.

### रिपाइंने पूर्ण ताकदीने काम केले

विधानसभा निवडणुकीत जागा न दिल्यास महायुतीच्या प्रचारात सहभागी होणार नाही, असा इशाराही रिपाइंच्या पदाधिकाऱ्यांकडून देण्यात आला.आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपाइंची भूमिका शहराध्यक्ष संजय सोनावणे, उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी स्पष्ट केली. माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, अॅड. मंदार जोशी, अशोक कांबळे, श्याम सदाफुले,पुण्यातील पिंपरी-चिंचवड आणि पुणे कॅन्टोन्मेंट या विधानसभा मतदारसंघाची मागणी केली आहे. लोकसभा निवडणुकीत रिपाइंने मतदारसंघात पूर्ण ताकदीने काम केले.

## चिखली परिसर भविष्यातील उद्योगनगरीचा ‘हार्ट ऑफ सिटी’

# विकास प्रकल्पांमुळे चिखलीचा कायापालट!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची भावना

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी- चिंचवड महापालिकेमध्ये 1997 मध्ये समाविष्ट झालेल्या चिखली परिसराचा खऱ्या अर्थाने कायापालट 2014 नंतर सुरू झाला. या भागात आता संतपीठ, पोलीस आयुक्तालय, न्यायालय संकुल, संविधान भवन उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे येत्या काही वर्षात चिखली परिसर शहराच्या विकासाचा केंद्रबिंदू अर्थात ‘हार्ट ऑफ सिटी’ ठरेल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.**



1997 ते 2014 अशा प्रदीर्घ कालावधीत भोसरी मतदारसंघातील समाविष्ट गावे विकासापासून वंचित राहिली. मात्र 2014 मध्ये भाजपचे सरकार आल्यानंतर या भागात सर्वाधिक निधी आणला. नागरिकांच्या सहकार्याने विकासाची गंगा यापुढेही या भागात अशीच वाहत राहील, असेही आमदार लांडगे म्हणाले. भोसरी विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांनी आपल्या प्रचाराचा नारळ टाळगाव चिखली येथील गणेश मंदिरात श्रीफळ अर्पण करुन केला. यावेळी सर्व स्थानिक नागरिक, ग्रामस्थ आणि महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे यावेळी म्हणाले, 2014 मध्ये विधानसभा निवडणूक लढविण्याआधी भोसरी मतदार संघातील रखडलेल्या विकास कामांचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी “व्हिजन 20-20” नागरिकांच्या पुढे ठेवले होते. यामध्ये दिलेल्या आश्वासनानुसार कामे पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न केला आहे. समाविष्ट गावांसाठी स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा देण्याचे मी सांगितले होते. त्यानुसार भामा आसखेडमधून अतिरिक्त पाणी शहराला उपलब्ध झाले. रस्ते, शैक्षणिक सुविधा, मल्टीपर्पज हॉस्पिटल यांसारखे प्रकल्प दृष्टिक्षेपात आहेत. भारतातील पहिले संविधान भवन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, पिंपरी-चिंचवड न्यायालय संकूल, आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पासाठी चिखली जलशुद्धीकरण केंद्र याच भागात विकसित होत आहे.



### रस्ता पूर्ण करण्याची जबाबदारी माझी...

आमदार महेश लांडगे म्हणाले की, चिखली परिसरातील अनेक रस्ते दृष्टिक्षेपात आहेत. ज्या भागात रस्त्यांची गरज आहे तेथील ग्रामस्थांनी एकत्र येऊन पुढाकार घ्या. वाटाघाटी करून रस्त्यासाठी जागा द्या. त्या भागात रस्ता पूर्ण करून देण्याची जबाबदारी माझी आहे. विरोधक जाणीवपूर्वक जागा देण्यासाठी अडवणूक करतात आणि रस्ता झाला नाही असे खोटे आरोप करतात. परंतु ग्रामस्थांना याची पुरेपूर जाणीव आहे.

“ 2014 ते 2024 या कालावधीतील भोसरी विधानसभा मतदारसंघाचा तुलनात्मक अभ्यास केला, तर सर्वाधिक निधी, सर्वाधिक प्रकल्प, सर्वाधिक विकास कामे ही या मतदारसंघांमध्ये झालेली दिसून येतील. 1997 मध्ये भोसरी मतदारसंघांमध्ये सर्वाधिक गावे समाविष्ट झाली. गावे समाविष्ट झाल्यापासून विकासाची गंगा या गावांपर्यंत पोहोचलीच नाही अक्षरशः पाण्यासाठी देखील या गावांना तहानलेले राहावे लागले. मात्र 2014 नंतर खऱ्या अर्थाने विकासाची गंगा या गावांमध्ये पोहोचली आहे. यापुढेही या गावांना विकासाचा शाश्वत चेहरा देण्याचे काम करणार आहे.

**– महेश लांडगे, आमदार,**
भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## वाल्हेकरवाडी, बिजलीनगर, चिंचवडेनगरमध्ये शंकर जगताप यांचा झंझावात!

### प्रचार दौऱ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद : गुजरात राज्याचे गृहमंत्री प्रदीप सिंह जडेजा यांची उपस्थिती

। चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभा निवडणुकीच्या धर्तीवर महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ आयोजित वाल्हेकरवाडी, बिजलीनगर, चिंचवडे नगर गावभेट दौऱ्यास स्थानिक ग्रामस्थ, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी गुजरात राज्याचे गृहमंत्री प्रदीप सिंह जडेजा यांची विशेष उपस्थिती होती.**



या गावभेट दौऱ्यानिमित्त शंकर जगताप यांनी वाल्हेकरवाडी, बिजली नगर आणि चिंचवडे नगर परिसरातील मान्यवर मंडळींच्या निवासस्थानी भेट देत त्यांच्याशी संवाद साधला. यामध्ये शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख भगवान वाल्हेकर, माजी सत्तारूढ पक्षनेते शामराव वाल्हेकर, शिक्षण मंडळाचे माजी सभापती श्रीधर वाल्हेकर, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती नाना शिवले, माजी नगरसेवक माऊली सूर्यवंशी, शेखर चिंचवडे, मोनाताई कुलकर्णी, आबा सोनवणे, रवींद्र वाल्हेकर, निखिल वाल्हेकर, अशोक शिवले, अनिल चिंचवडे, बाबाजी चिंचवडे, सागर चिंचवडे, अशोक भालके, आनंदा चिंचवडे, अशोक वाल्हेकर, पोपट शिवले, दिलीप साठे या ग्रामस्थांच्या निवासस्थानी जगताप यांनी भेट देत त्यांच्याशी चर्चा केली.

ग्रामस्थांच्या वतीने ठिकठिकाणी फटाक्यांच्या माळा फोडून आणि औक्षण करून शंकर जगताप यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या गावभेट दौऱ्याप्रसंगी माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेवक प्रमोद कुटे, शहर उपाध्यक्ष सुधीर वाल्हेकर, माजी स्वीकृत सदस्य बिभीषण चौधरी, कविता दळवी, पल्लवी वाल्हेकर, पल्लवी मारकड, सुधीर चिंचवडे, मनोज तोरडमल, युवराज वाल्हेकर, निखिल वाल्हेकर, सोमनाथ वाल्हेकर, शैलेश वाल्हेकर, वाल्मिक शिवले, सचिन शिवले, गौरव शिवले, संदीप शिवले, रेणुका आनंदपुरे, अनिकेत दळवी, प्रदीप पटेल, भगवान निकम, बिरमल चौबे, शिवाजी आवारे, कीर्ती परदेशी यांच्यासह महायुतीचे शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बिजलीनगर विरंगुळा केंद्राला दिली भेट

यावेळी बिजलीनगर येथील गिरीराज हौसिंग सोसायटी भागातील माजी उपमहापौर सचिन चिंचवडे यांच्या माध्यमातून भरविण्यात येणाऱ्या आठवडे बाजारात पदयात्रा काढत भाजीविक्रेते आणि खरेदीसाठी आलेल्या नागरिकांशी शंकर जगताप यांनी संवाद साधला. तसेच कै. सोपानराव भोईर विरंगुळा केंद्रातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

### चिंचवडेनगर येथे कोपरा सभेचे आयोजन

शंकर जगताप यांच्या गावभेट दौऱ्यावेळी चिंचवडे नगर येथील साईराज कॉलनी तसेच ओंकार कॉलनी याठिकाणी भूषण पाटील आणि कैलास पाटील यांच्या वतीने कोपरा सभेचे आयोजन करण्यात आले होते. ज्या ताकदीने आम्ही स्व. लक्ष्मणभाऊ आणि अश्विनीताईंच्या पाठीशी उभे होतो, तेव्हढ्याच ताकदीने आम्ही तुमच्याही पाठीशी उभे आहोत. आणि या परिसरातील १०० टक्के मतदान तुम्हालाच होणार, असे आश्वासन या सभेला उपस्थित शेकडो नागरिक आणि महिलांनी जगताप यांना दिले.

# ब्रिक्स’ परिषद भारतासाठी महत्वाची



## भूमिका

**जगाच्या विविध भागांमध्ये युद्ध किंवा युद्धजन्य परिस्थितीमुळे उभे राहिलेले तणाव आणि जागतिक पुरवठा साखळी विस्कळित झाल्याने व्यापारातील अडचणींच्या पाश्र्वभूमीवर रशियात होत असलेल्या ‘ब्रिक्स’ देशांच्या शिखर परिषदेकडे यंदा जगाचे लक्ष आहे.**

यंदापासून इजिप्त, इथिओपिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती यांचाही ‘ब्रिक्स’ मध्ये समावेश होणार आहे. यातील बहुतेक देशांशी भारताचे निकटचे संबंध आहेत. अरब व आफ्रिकी देशांसाठी हे व्यासपीठ महत्त्वाचे ठरणार आहे. जागतिक पातळीवर दबावगट म्हणून ‘ब्रिक्स’ चा प्रभाव या समावेशामुळे वाढण्याची आशा असून भारतासह अनेक देशांना अभिप्रेत ‘बहुध्रुवीय’ रचना साकारण्याच्या दृष्टीने हा विस्तार महत्त्वाचा आहे. ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या उपस्थितीत सन २००६मध्ये झालेल्या बैठकीत या गटाची स्थापना झाली. २०१० मध्ये दक्षिण आफ्रिकाही या गटात सहभागी झाला. या देशांच्या आद्याक्षरांमुळे त्याला ‘ब्रिक्स’ नाव देण्यात आले. जगातील ४२ टक्के लोकसंख्या आणि एकूण जागतिक उत्पन्नात २७ टक्के वाटा असलेल्या जागतिक स्तरावर उगवत्या अर्थव्यवस्थांच्या देशांनी एकत्र येण्यामागे विविध




उद्देश होते. राजनैतिक, आर्थिक आणि सांस्कृतिक सहकार्य, जागतिक व्यापाराला चालना, तसेच विकसनशील देशांची फळी मजबूत करणे आणि परस्पर व्यापार, गुंतवणूक व अन्य क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या ‘ब्रिक्स’चा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. ‘जी ७’ या गटास भविष्यकालीन पर्याय म्हणूनही या गटाकडे पाहतात. ‘ब्रिक्स’ समूहाने सन २०१४ मध्ये पायाभूत सुविधा आणि विकास योजनांना अर्थसाह्य देण्याच्या उद्देशाने ‘न्यू डेव्हलपमेन्ट बँके’ची स्थापना केली. तसेच, परस्परांत विज्ञान, उद्योग, शेती आणि नवे तंत्रज्ञान या क्षेत्रांत सहकार्य वाढीस लागले आहे. जागतिक व्यासपीठांवर विकसनशील देशांचा आवाज मजबूत करण्यात ‘ब्रिक्स’चा मोठा वाटा आहे. विकास, स्थैर्य आणि सुधारणांबाबत परिषदेत आढावा घेण्यात येतो. परस्पर व्यापार आणि गुंतवणूक वाढविण्यासाठी नव्या योजना मांडण्यात येतात. सध्या भेडसावत असलेल्या सुरक्षा प्रश्नांवरही चर्चा अपेक्षित आहे. दहशतवाद, सायबर सुरक्षा हे महत्त्वाचे मुद्दे असतील. तसेच आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने काही ठराव येऊ शकतात. एकीकडे रशिया-युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे, तर इस्रायल व गाझा यांच्यातील युद्धाची धग कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्या पाश्र्वभूमीवर रशियाच्या विरोधात उभी असलेली अमेरिका आणि युरोपीय देशांचे या परिषदेतील रशिया व अन्य देशांच्या; विशेषतः रशियाशी मैत्री असलेल्या भारताच्या भूमिकेकडे लक्ष आहे. दुसरीकडे मध्यपूर्व देशांची भारताशी जवळीक वाढण्याची शक्यता आहे. या समूहाचे ‘ब्रिक्स’ चलन सुरू करण्याबाबतही चर्चा आहे. या परिषदेत त्यावर एकमत झाल्यास सध्या प्रामुख्याने डॉलरमध्ये चालणा-या आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये नवे चित्र उभे राहू शकते आणि व्यापारयुद्धाला नवे वळण लागू शकते, अशी शक्यता पाश्चात्त्य राष्ट्रांना वाटते. परिषदेला उपस्थित असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय चर्चा होण्याची शक्यता आहे. गेल्या काही काळातील दोन्ही देशांमधील वाढलेला तणाव कमी होण्यासाठी या चर्चेतून काही पावले पुढे पडू शकतात, असे अभ्यासकांचे मत आहे. लडाख सीमाप्रश्नावरील चर्चेतून दोन्ही देशांमध्ये काही सहमती आहे; पण चीनचा वर्चस्व-विस्तारवाद, दोन्ही देशांतील आर्थिक स्पर्धा, चीनचा ‘बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह’ प्रकल्प, पाकिस्तान, श्रीलंकेसह मालदीवशी सहकार्यावरून तणाव असे वादाचे मुद्देही आहेत. जगातील ४२ टक्के लोकसंख्या आणि एकूण जागतिक उत्पन्नात २७ टक्के वाटा असलेल्या जागतिक स्तरावर उगवत्या अर्थव्यवस्थांच्या देशांनी एकत्र येण्यामागे विविध उद्देश होते.तसेच विकसनशील देशांची फळी मजबूत करणे आणि परस्पर व्यापार, गुंतवणूक व अन्य क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या ‘ब्रिक्स’चा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे.

## प्रासंगिक »

### सहमतीतील अर्थमती

***गस्तक्षेत्र पूर्ववत होणे हे दोन देशांतील मतभेद मिटवण्याच्या दिशेने टाकलेले एक लहान पाऊल. पुढची पायरी सैन्यमाघारी व निर्लष्करीकरणाची आहे...***

भारत आणि चीन यांच्यात पूर्व लडाख टापूमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेलगत दोन महत्त्वाच्या स्थानांवर गस्तबिंदूविषयी परस्पर संमती आणि समझोता झाला हे छानच झाले म्हणायचे. या संदर्भातील घोषणा परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी केली. दोन्ही देशांदरम्यान संबंध सुविहित होण्याच्या दिशेने ही घडामोड हे महत्त्वाचेच पाऊल. मे-जून २०२० पासून म्हणजे गलवानच्या आधीच्या चकमकी आणि गलवानमधील धुमश्चक्री झाल्यानंतर पूर्व लडाखमधील जवळपास सात ठिकाणी चीनने मूळ ‘बफर’ क्षेत्रात घुसखोरी करून, पूर्वनिर्धारित गस्तबिंदूंची एकतर्फी फेरआखणी करण्याचा प्रयत्न केला. पण त्यासाठी निर्धारित गस्तबिंदूंचे पावित्र्य राखणे अपेक्षित असते. चीनने त्याचा भंग केला आणि या टापूतील शांतता विस्कळीत झाली. गलवान खोऱ्यातील धुमश्चक्रीत भारताचे कर्नलसह २० जवान शहीद झाले. चीनचीही मनुष्यहानी झाली.

भारतीय घटनाकारांनी लोकशाहीचे चार स्तंभ उभे केले. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा स्तंभ म्हणजे न्यायालय आणि सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड त्या व्यवस्थेचे सर्वोच्च आहात. त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याचा नागरिकांना अभिमान आहे. परंतु सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या काही गोष्टी मात्र मनाला अतिशय खटकतात.

# कणखर भूमिंका घेतली नाही

ज्या ठिकाणी कणखर भूमिका घ्यायला पाहिजे होती तिथे त्यांनी ती घेतली नाही. सर्वसाधारण सगळ्याच विचार करू शकणाऱ्या नागरिकांचे हे मत आहे.) महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेल्या दोन ते अडीच वर्षांमध्ये सर्व राजकीय पुढाऱ्यांनी विचका करून टाकला. महाराष्ट्राकडे एक सुसंस्कृत राज्य म्हणून सगळा देश आदराने पाहायचा तिथं महाराष्ट्राला मान खाली घालावी लागते आहे. गेल्या ७० ते ७५ वर्षांमध्ये आजपर्यंत जी एक रुढार्थाने म्हण आहे की ‘महाराष्ट्र मेला तर राष्ट्र मेले’ ती या सर्व राजकीय पुढाऱ्यांनी पुसून टाकली.शिवसेना या पक्षाविषयी सरन्यायाधीश चंद्रचूड निर्णय घेऊ शकले नाहीत, याबद्दल अतिशय आश्चर्य आणि खेद वाटतो. शिवसेना खरी कोणाची हे महाराष्ट्रातले अगदी बोबडे मूलदेखील सांगू शकते. फक्त कागदांचे खेळ करत राहणे आणि न्यायाला विलंब करणे म्हणजे न्याय नाकारणे हे सर्वोच्च न्यायालयाकडून अपेक्षित नव्हते. राज्यपाल हे घटनात्मक पद,



पण त्याचा किती दुरूपयोग केला गेला हे सगळ्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले. सर्वसाधारण माणसाने एखाद्या दिवशी विनाकारण रजा घेतली तर त्याला मेमो दिला जातो किंवा निलंबनाची कारवाई केली जाते. परंतु राज्यपाल महोदय दोन दोन वर्ष सरकारने लिहून पाठवलेल्या आमदारांची निवड करू शकत नाही आणि राज्य विनाआमदार चालले होते. याचा जाब या सर्वोच्च पदावरील व्यक्तींना कोणीही विचारणार नाही का? की कायदे हे फक्त सर्वसाधारण नागरिकांसाठीच आहेत? कामगार किंवा अधिकारी दिलेल्या वेळेत काम करू शकले नाही तर त्यांना नोटीस दिली जाते किंवा बडतर्फ केले जाते. मग राज्यपाल देव आहे का? राज्यपाल दिलेली कामे न करता फक्त राजभवनात बसून राजकारण करत राहतात आणि सर्वोच्च न्यायालयाने हे सगळे पाहत बसते त्याचे दुःख अधिक. लोकांना रोजगार नाही, हाताला काम नाही. फक्त सरकारी तिजोरी खाली करत राजकारणी आपला उद्योग करत आहेत. आणि देशात तरुण वर्ग हा आळशी आणि ऐतखाऊ बनत चालला आहे. देशातील पंतप्रधानही या रेवडीचे समर्थन करतात तेव्हा सर्वसाधारण माणसाची अपेक्षा असते की आपल्याला जगातील सर्वोत्कृष्ट पाच देशांमध्ये नाव कमवायचे असेल तर.सर्वोच्च न्यायालयाने यात हस्तक्षेप करून या सर्वांना देशाच्या प्रगतीबद्दल, सुरक्षिततेबद्दल कान टोचावेत. पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रातील बदलापूर येथे घडलेल्या घटनांनी देशाची आणि राज्याची मान खाली गेली. या संपूर्ण घटनेमध्ये राज्य आणि केंद्र सरकार फक्त राजकारण करत होते. गेल्या वर्षा दीड वर्षापासून मणिपूर जळत आहे. परंतु देशाच्या सर्वोच्च पदी असणाऱ्या व्यक्तीला तिथे जायला वेळ मिळाला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मविआचा 85-85-85 चा फॉर्म्युला!

## समाजवादी पार्टी व अन्य छोट्या पक्षांना जागा सोडण्याचा निर्णय

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला अखेर जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे याबाबतचा सस्पेन्स अखेर आता संपला आहे. महाविकास आघाडीचे जागा वाटप झालं असून महाविकास आघाडीने जागावाटपाचा फॉर्म्युला आज पत्रकार परिषद घेऊन सांगितला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला प्रत्येकी ८५ जागा देण्यात आल्या आहेत.**



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, ठाकरे गटाचे नेते संजय राऊत, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज वाय. बी. चव्हाण सेंटर येथील बैठकीनंतर पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला काय ठरला आहे, याबाबत माहिती दिली. महाराष्ट्रात गेल्या अनेक दिवसांपासून महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरु होत्या. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची जागावाटपावरुन सातत्याने चर्चा सुरु होत्या. या जागावाटपाच्या बैठकीत काही वेळेला वादही झाले. विशेष म्हणजे ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यात तर मोठा वाद झाला होता. पण ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या मध्यस्थीने हा वाद मिटवण्यात आला. वाय. बी. चव्हाण सेंटर येथे त्याच निमित्ताने आज शरद पवारांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत शरद पवार, संजय राऊत, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, नाना पटोले, जयंत पाटील होते. या बैठकीनंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला. संजय राऊत पत्रकार परिषदेत म्हणाले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला प्रत्येकी ८५ जागा देण्यात आल्या आहेत. म्हणजेच, २७० जागांचं जागावाटप झालेलं आहे. २८८ पैकी २७० जागांची यादीही तयार झाली तसंच, उर्वरित जागा इतर मित्रपक्षांना देण्यात येणार आहेत. त्यासंदर्भात उद्या सकाळपासून चर्चा सुरू होईल, असं संजय राऊत म्हणाले. केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर करून आता आठवडा लोटेल. उमेदवार अर्ज प्रक्रियाही सुरू झालेली आहे. परंतु, महाविकास आघाडीचे जागा वाटप काही होत नव्हते. गेल्या काही दिवसांपासून तिन्ही प्रमुख पक्षांतील वरिष्ठ नेत्यांच्या चर्चा सुरू होत्या. परंतु, या चर्चांना पूर्णविराम मिळत नव्हता. त्यातच शिवसेना आणि काँग्रेस यांच्यातील मुंबई आणि विदर्भातील काही जागांवर वाद असल्याचं समोर आलं. त्यामुळे जागा वाटप रखडले असल्याचंही सांगण्यात आलं. परंतु, आता जागावाटप झालं. मुंबईतील काही जागांवरही दोन्ही बाजूने ताणले गेल्याने पुन्हा चर्चा करण्यात आली. जागावाटपात काँग्रेस ८५, शिवसेना ८५ तर राष्ट्रवादीला ८५ जागा लढविण्याचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. डावे पक्ष, समाजवादी पार्टी व अन्य छोट्या पक्षांना तिन्ही पक्षांनी आपापल्या कोट्यातून जागा सोडाव्यात, असा निर्णय घेण्यात आला. तसेच उर्वरित 18 मतदारसंघ महाविकास आघाडी मित्र पक्षांना सोडणार आहे. अर्थात कुणाला किती जागा देणार याबाबत चर्चा सुरु असल्याचं नाना पटोले आणि इतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी सांगितलं. काँग्रेस आणि शिवसेनेत (ठाकरे) जागावाटपावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या मंगळवारी आणि बुधवारी झालेल्या बैठकीत कोणी किती जागा लढवायच्या याचे सूत्र निश्चित करण्यात आले. यानुसार काँग्रेस ८५, शिवसेना (ठाकरे) ८५ तर राष्ट्रवादी (शरद पवार) ८५ जागा लढविण्यावर सहमती झाली आहे. आज मुंबईत शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत हे सूत्र ठरवण्यात आले. तसंच, उर्वरित जागा इतर मित्रपक्षांना देण्यात येणार आहेत.आम्ही डिटेल्स देऊ. शरद पवार यांच्या नेतृत्वात तिन्ही पक्षाची बैठक झाली.

### 85 जागा लढविण्यावर सहमती

उमेदवार अर्ज प्रक्रियाही सुरू झालेली आहे. परंतु, महाविकास आघाडीचे जागा वाटप काही होत नव्हते. गेल्या काही दिवसांपासून तिन्ही प्रमुख पक्षांतील वरिष्ठ नेत्यांच्या चर्चा सुरू होत्या. परंतु, या चर्चांना पूर्णविराम मिळत नव्हता. त्यातच शिवसेना आणि काँग्रेस यांच्यातील मुंबई आणि विदर्भातील काही जागांवर वाद असल्याचं समोर आलं. त्यामुळे जागा वाटप रखडले असल्याचंही सांगण्यात आलं. परंतु, आता जागावाटप झालं. मुंबईतील काही जागांवरही दोन्ही बाजूने ताणले गेल्याने पुन्हा चर्चा करण्यात आली. जागावाटपात काँग्रेस ८५, शिवसेना ८५ तर राष्ट्रवादीला ८५ जागा लढविण्याचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे.

# भाजपाने मुंबईतील पहिली बंडखोरी रोखली!

## फडणवीसांनी पुरोहितांची भेट घेऊन त्यांची नाराजी दूर केली

। अमरावती ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भाजपाने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर भाजपामध्ये नाराजी नाट्य सुरू झाले. अनेक इच्छुक उमेदवारांना संधी न दिल्याने ते बंडखोरीच्या तयारीत आहेत. कुलबा विधानसभा मतदारसंघातही हे बंडखोरीचं ग्रहण लागलं होतं. परंतु, मुंबईतील ही पहिली बंडखोरी भाजपाने मोडून काढली आहे. त्यामुळे घोषित झालेला उमेदवार आणि नाराज माजी मंत्री आता एकत्र मिळून विधानसभेची तयारी करणार आहेत.**



आज त्यांनी पत्रकार परिषद घेऊन या नाराजीनाट्यावर पडदा टाकला. कुलाबा विधानसभा मतदारसंघात राहुल नार्वेकर आमदार आहेत. भारतीय जनता पक्षाच्या पहिल्या यादीत या मतदारसंघातून पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांना उमेदवारी देण्यात आली.त्यामुळे राज पुरोहित वेगळा निर्णय घेतील की काय अशी शक्यता वर्तवली जात होती. परंतु, देवेंद्र फडणवीसांनी या राज पुरोहितांची भेट घेऊन त्यांची नाराजी दूर केल्याचे बोलले जात आहे. त्यानंतर राहुल नार्वेकर आणि राज पुरोहित यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन मतदारांमधील संभ्रम दूर केला. राहुल नार्वेकर म्हणाले, " ही निवडणूक राज पुरोहितांची आहे, ही राहुल नार्वेकरांची निवडणूक आहे. आम्ही एकत्र येऊन किमान ५० हजार मतांनी ही निवडणूक जिंकू, असं मी कुलाब्यातील जनतेला सांगू इच्छितो. भाजपाच्या जास्तीत जास्त जागा निवडून आणण्याकरता आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.

### कुलाब्यातील समीकरण काय?

दक्षिण मुंबईत अर्थात कुलाबा विधानसभा मतदारसंघात भाजपा नेते राज पुरोहित यांचा चांगलाच दबदबा होता. मात्र, २०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीनंतर दक्षिण मुंबईत भाजपात दोन गट पडल्याचं बोललं जातं. २००९ व २०१४ मध्ये राज पुरोहित यांना कुलाबा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. पण २००९ मध्ये त्यांचा पराभव झाला होता, तर २०१४ मध्ये ते प्रथमच विधानसभेवर निवडून गेले होते. त्यानंतर २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज पुरोहित यांना दुसऱ्यांदा उमेदवारी मिळण्याची शक्यता होती.

# पर्यावरण कायदा दंतहीन!

## दिल्लीतील प्रदूषणावरून न्यायालयाचे केंद्रावर ताशेरे!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**गेल्या काही दिवसांपासून दिल्लीतील वातावरण गढूळ होत जातंय. वायू प्रदूषणामुळे नागरिक हैराण झाले असून खराब हवेमुळे येथील नागरिकांचं आरोग्य धोक्यात आलं आहे. यावरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारवर ताशेरे ओढले. सुधारणांद्वारे तयार केलेला पर्यावरण संरक्षण कायदा म्हणजे दंतहीन असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं. दरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) ऐश्वर्या भाटी यांनी केंद्राचे प्रतिनिधित्व करत न्यायालयाला आश्वासन दिले की १० दिवसांत नियम अंतिम केले जातील आणि कायदा कार्यान्वित केला जाईल.**



न्यायमूर्ती अभय श्रीनिवास ओका यांच्या खंडपीठाने पर्यावरण संरक्षण कायद्याचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई न केल्याबद्दल पंजाब सरकारला फटकारले. “पंजाबमधील ज्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही त्यांच्यावर खटला चालवा. तीन वर्षांनंतरही आमच्या आदेशांचे पालन केले जात नाही”, असे न्यायालयाने म्हटले आहे.पंजाब आणि हरियाणा या दोन्ही राज्यांचे सचिव (पर्यावरण) आणि अतिरिक्त मुख्य सचिव (कृषी) यांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आल्याचे एएसजीने न्यायालयाला सांगितले. “१० दिवसात, कलम १५ पूर्णपणे कार्यान्वित होईल”, असं अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी सांगितलं. यावर न्यायालयाने म्हटले, “नियम तुम्हाला खटला चालवण्याची परवानगी देतात. तुम्ही त्यांच्यावर खटला चालवा अन्यथा काहीही होणार नाही”. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की कलम २१ नुसार जगण्याचा अधिकार, शुद्ध हवा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. अशा स्थितीत सरकारांचे अपयश म्हणजे नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे थेट उल्लंघन आहे. राज्यांनी दिलेल्या प्रस्तावावर दोन आठवड्यांत निर्णय घ्यावा आणि भरपाईची रक्कम वाढवण्याबाबतच्या नियमात बदल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आम्ही स्पष्ट करतो की जर परिस्थिती सुधारली नाही आणि असेच चालू राहिले तर आम्ही कठोर आदेश जारी करू. राज्ये आणि आयोग यांच्यातील समन्वयही महत्त्वाचा आहे, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.राष्ट्रीय राजधानीत आज प्रचंड धुकं जमा झालं होतं. तिथे हवेची गुणवत्ता ३६३ AQI सह ‘अत्यंत खराब’ श्रेणीत राहिली. तर आणखी काही भाग “गंभीर” झोनमध्ये आले. जवळजवळ सर्व हवामान निरीक्षण केंद्रे रेड झोनमध्ये होती. जहांगीरपुरी मॉनिटरिंग स्टेशनने ४१८ वर “गंभीर” वायु गुणवत्ता निर्देशांक नोंदवला, तर विवेक विहारचे वाचन ४०७ आणि आनंद विहारचे ४०२ होते. सकाळी ९ वाजता, सोनिया विहार येथे AQI “गंभीर” श्रेणीच्या जवळ ३९८ होता, तर वजीरपूरमध्ये ३९६ नोंदवला गेला.एअर क्वालिटी अर्ली वॉर्निंग प्रोटेक्शन यंत्रणेच्या अहवालातून पुढील दोन दिवसांत दिल्लीतील हवेचे प्रदूषण पाच पटीने वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्याचवेळी कार्बन मोनोऑक्साईडची पातळी सात पटींपर्यंत जाऊ शकते. अशी परिस्थिती उद्भवल्यास श्वास घेण्यास अडचणी निर्माण होतील. तसंच, अनेक रुग्णशय्येवर असलेल्या रुग्णांसाठीही ही धोक्याची घंटा आहे. याच कारणामुळे पंजाब, हरियाणामध्येही वायू प्रदूषण वाढले आहे.

### आम्ही कठोर आदेश जारी करू

राज्यांनी दिलेल्या प्रस्तावावर दोन आठवड्यांत निर्णय घ्यावा आणि भरपाईची रक्कम वाढवण्याबाबतच्या नियमात बदल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आम्ही स्पष्ट करतो की जर परिस्थिती सुधारली नाही आणि असेच चालू राहिले तर आम्ही कठोर आदेश जारी करू. राज्ये आणि आयोग यांच्यातील समन्वयही महत्त्वाचा आहे, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.राष्ट्रीय राजधानीत आज प्रचंड धुकं जमा झालं होतं. तिथे हवेची गुणवत्ता ३६३ AQI सह ‘अत्यंत खराब’ श्रेणीत राहिली. तर आणखी काही भाग “गंभीर” झोनमध्ये आले. जहांगीरपुरी मॉनिटरिंग स्टेशनने ४१८ वर “गंभीर” वायु गुणवत्ता निर्देशांक नोंदवला.

---

# सोनम वांगचूक यांचे उपोषण मागे

## आश्वासन मिळाले नसले तरी आमचा विश्वास कायम: वांगचूक

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लडाखला सहाव्या अनुसूचीचा दर्जा मिळण्यासाठी पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी १५ दिवसांनंतर केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आश्वासनानंतर आपलं उपोषण सोडलं. केंद्रीय गृह मंत्रालयाने आता त्यांना त्यांच्या मागण्याबाबत चर्चा करण्यासाठी ३ डिसेंबर रोजी बैठकीसाठी बोलावले आहे. त्यामुळे या बैठकीकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.**

सोनम वांगचुक यांनी आपल्या समर्थकांसह राजधानी दिल्लीत तब्बल १५ दिवस उपोषण केलं आहे. या दरम्यान सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यातही घेतलं होतं. त्यामुळे केंद्र सरकारवर विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती. सोनम वांगचुक यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह बेमुदत उपोषण केलं. संविधानाच्या सहाव्या अनुसूचीअंतर्गत समावेश करावा, लडाखसाठी लोकसेवा आयोगासह लवकर भरती प्रक्रिया आणि लेह, कारगी जिल्ह्यांसाठी स्वतंत्र लोकसभेच्या जागा मिळाव्यात, यासह आदी मागण्या सोनम वांगचुक यांनी केलेल्या आहेत. गृह मंत्रालयाच्या आश्वासनानंतर तुम्ही उपोषण सोडलं. आता चर्चांमध्ये



तुम्हाला कशाची आशा आहे? या प्रश्नावर उत्तर देताना सोनम वांगचुक म्हणाले, (संविधानाच्या) सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्याबाबत चर्चा करतील आणि लडाखची स्थानिक संस्कृती, पर्यावरण, जमीन, जंगल आणि रीतिरिवाजांना घटनात्मक सुरक्षा प्रदान करतील. तसेच मला आशा आहे की जम्मू आणि काश्मीरमध्ये लवकरच राज्याचा दर्जा बहाल केला जाणार आहे. मग लडाख देखील त्यास पात्र असले पाहिजे. लडाखमध्ये निदान कायदेमंडळ तरी स्थापन केले पाहिजे. यावर चर्चा होईल, अशी अपेक्षा आहे. गेल्या सहा वर्षांपासून (कलम ३७० रद्द झाल्यापासून) लडाखमधील तरुण बेरोजगार आहेत, तर केंद्रशासित प्रदेश फक्त जिल्हा प्रशासनाच्या मनुष्यबळावर चालवला जात आहे. त्यासाठी ६,००० कोटी रुपयांचे अनुदान म्हणून येते आणि या अनुदानापैकी निम्मे अनुदान परत जाते. आम्हाला आशा आहे की लडाखसाठी लोकसेवा आयोग स्थापन करण्यावर चर्चा होईल. तुम्हाला कशामुळे आशा आहे? कारण याआधीचे तुमचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाले? २०२१ मध्ये स्थापन झालेल्या समितीचीही निवडणूक होऊ शकली नाही.

### सहाव्या अनुसूचीची मागणी कायदेशीर

या प्रश्नावर बोलताना सोनम वांगचुक म्हणाले, सरकारकडून कोणतेही आश्वासन मिळाले नसले तरी आमचा विश्वास कायम आहे. संवेदनशील सीमावर्ती भागात जनआंदोलनानंतर या वेळी चर्चा होत आहे. ते (केंद्र) सामान्य जनतेचा सखोल सहभाग पाहण्यास सक्षम आहेत. या पदयात्रेने (लडाख ते दिल्ली) लोक या समस्येला किती गांभीर्याने घेत आहेत हे दाखवून दिले.लडाखला सहाव्या अनुसूचीचा दर्जा मिळण्यासाठी पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी १५ दिवसांनंतर केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आश्वासनानंतर आपलं उपोषण सोडलं.

# मी खरेदी केलेली संपत्ती माझ्याच नावावर



सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेत्री शर्मिला टागोर यांनी आपल्या संपत्तीबाबत माहिती दिली आहे. लहान वयातच पैसे कमवायला सुरुवात करणाऱ्या शर्मिला यांनी सांगितलं की त्यांनी जेवढी संपत्ती खरेदी केली ती कुठे आहे याची माहिती दिवंगत पती मन्सूर अली खान (टायगर) पतौडी यांना होती. पण स्वतःच्या पैशाने खरेदी केलेली सर्व मालमत्ता माझ्या नावावर आहे, असं त्या म्हणाल्या. आपण विकत घेतलेली कोणतीच संपत्ती पतीच्या नावावर नाही, सर्व स्वतःच्याच नावाने घेतल्याचा खुलासा एका मुलाखतीत शर्मिला यांनी केला. "मी जे काही विकत घेतलं, माझी संपत्ती जसं की घर, कार किंवा कोणतीही वस्तू, दागिने...ते सगळं आधीपासूनच माझ्या नावावर आहे. मी ते पतीबरोबर शेअर केलं नाही, माझी संपत्ती माझ्या पतीच्या नावाने नाही. तसेच टायगरने जे काही घेतलं ते त्याच्या नावावर आहे आणि त्याबद्दल त्याने मृत्यूपत्र बनवून ठेवलेलं आहे," असं त्या म्हणाल्या. इस्लाममध्ये मृत्यूपत्र बनवण्याची परवानगी नाही, असा दावा शर्मिला टागोर यांनी केला. "इस्लाममध्ये मृत्यूपत्र करण्याची परवानगी नाही, पण आम्हाला असं करावं लागलं. इस्लामनुसार, तुम्ही तुमची संपत्ती दुसऱ्यांना देऊ शकता, पण तुमच्या वारसांना देऊ शकत नाही. संपत्तीचा २५%, ५०% वाटा असं काहीतरी आहे, त्यामुळे ते समजून घेणं गरजेचं होतं. आमच्याकडे खूप जमीन आहे, त्यामुळे ती कोणाच्या नावावर करायची, याचा विचार करणंही आवश्यक होतं. मला तीन मुलं आहेत. त्यामुळे सर्व काही नियमानुसार करावं लागेल.

# विनयभंगाच्या सीनआधी खूप रडली होती माधुरी



ज्येष्ठ अभिनेते रणजीत यांनी त्यांच्या करिअरमध्ये अनेक चित्रपटांमध्ये खलनायकाच्या भूमिका केल्या. बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध खलनायक रणजीत यांनी एका मुलाखतीत माधुरी दीक्षितबरोबर शूटिंगची एक आठवण सांगितली आहे. 'प्रेम प्रतिज्ञा' चित्रपटात विनयभंगाचा एक सीन शूट करायचा होता, पण तो सीन करण्याआधी माधुरी खूप रडली होती, असं ते म्हणाले. 'एएनआय'ला दिलेल्या मुलाखतीत रणजीत म्हणाले, "ती (माधुरी दीक्षित) रडू लागली आणि सीन करण्यास नकार दिला. मला परिस्थितीची कल्पना नव्हती. मला काही कला दिग्दर्शकांनी याबद्दल सांगितलं होतं. त्यातला एक बंगाली होता. आमचे दिग्दर्शक बापू होते आणि ते दक्षिण भारतीय होते. मी सेटवर मजा करायचो 'डार्लिंग थोडं तिकडे बघ, मी कपडे बदलतो,' असं सह-कलाकारांना म्हणायचो. मला तर मेकअप रुममध्ये जायचीही सवय नव्हती. मी तसाच होतो आणि मला तसंच स्वीकारलं गेलं."विनयभंगाचा सीन हातगाडीवर होणार होता आणि ते माधुरीची वाट पाहत होते, असं त्यांनी सांगितलं. "तिचं रडणं चालूच होतं, मला दुसऱ्या शूटला जायचं होतं आणि मी त्यांना माधुरीला बोलवायला सांगितलं. पण माधुरी या सीनसाठी तयार नसल्याचं मला कुणीच सांगितलं नाही. शेवटी तिने होकार दिला. वीरू देवगण फाइट मास्टर होते. ते म्हणाले 'आम्ही कॅमेरा फिरवत राहू, सीन मध्येच कट व्हायला नको.' विनयभंग हा आमच्या कामाचा भाग आहे. खलनायक खऱ्या आयुष्यात वाईट नसतो," असं रणजीत म्हणाले.चित्रपटातील असे जबरदस्तीचे, विनयभंगाचे सीन खूप काळजीपूर्वक शूट केले जायचे. बऱ्याचदा अशा सीनमध्ये मी दुरुस्त्या सुचवायचो आणि दिग्दर्शक ते मान्य करायचे, असंही रणजीत यांनी या मुलाखतीत सांगितलं. ज्येष्ठ अभिनेते रणजीत यांनी त्यांच्या करिअरमध्ये अनेक चित्रपटांमध्ये खलनायकाच्या भूमिका केल्या.

# तापसीच्या लग्नाची बातमी खरी

बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू बॉयफ्रेंड मॅथियस बोबरोबर काही दिवसांपूर्वी लग्नबंधनात अडकली. मित्रपरिवार आणि कुटुंबासमवेत दोघांनी गुपचूप लग्नसोहळा उरकला. सध्या इंटरनेटवर तापसीच्या लग्नाचीच चर्चा सुरू आहे. परंतु, तापसीनं यावर अद्याप काही भाष्य केलेलं नाही. अशातच अभिनेत्रीच्या लग्नातला व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हारल होतोय. यावरून तापसीच्या लग्नाची बातमी खरी ठरली आणि चाहत्यांचा आनंद द्विगुणित झाला असं म्हणायला हरकत नाही. लग्नानंतर तापसी पन्नूने पहिल्यांदाच मुलाखत दिली आहे. नुकत्याच एलेला दिलेल्या मुलाखतीत तापसी म्हणाली, "या क्षणी मला वाटतं की, माझ्या व्यावसायिक निवडी मोठ्या प्रमाणात माझ्या वेळेच्या मूल्यावर आधारित आहेत. मला खात्री करून घ्यायची आहे की, एखादा प्रोजेक्ट घेऊन मी माझा वेळ सत्कारणी लावत आहे की नाही. कारण कामाच्या पलीकडे जाऊन त्याचा मला आनंद घ्यायचा आहे. मला आजपासून माझ्या फिल्मोग्राफीची आवड जपायची आहे, म्हणून मला अशा कोणत्याही गोष्टीत वेळ वाया घालवायचा नाही, जिथे तो वेळ सत्कारणी लागत नसेल.

# कपड्यांवर वायफळ खर्च करणं व्यर्थ



'सिता रामम', 'हाय नन्ना' अशा चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी मृणाल ठाकूर ही आताच्या घडीची लोकप्रिय अभिनेत्री आहे. बॉलिवूडमध्येही मृणालने स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. 'फॅमिली स्टार' या आगामी चित्रपटातह झळकणार आहे. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत कपड्यांवर वायफळ खर्च करणं हे तिला व्यर्थ वाटत असल्याचं तिने म्हटलं आहे. 'गलाटा प्लस'ला दिलेल्या मुलाखतीत मृणाल म्हणाली, "डिझायनर कपड्यांवर मला जास्त पैसे खर्च करायला आवडत नाहीत. कारण- जर ट्रेंड गेला तर ते पुन्हा वापरता येत नाहीत. तुम्ही ते परत घालणार नाही. "मुलाखतीत घातलेल्या कपड्यांबद्दल विचारलं असता मृणाल म्हणाली, "हे माझे कपडे नाहीत. मी यांचा वापर फक्त प्रमोशन्ससाठी करते. या टॉपसाठी जास्तीत जास्त मी २ हजार रुपये खर्च केले आहेत आणि तेही मला जास्त वाटत आहेत.

# ऑस्करच्या अधिकृत पेजवर झळकली दीपिका पदुकोण!

"दीपिका पुदकोण 'बाजीराव मस्तानी' चित्रपटातील "दीवानी मस्तानी..." या गाण्यावर परफॉर्म करत असून श्रेया घोषालने हे गाणं गायलं आहे.", असं कॅप्शन देत ऑस्करने अभिनेत्रीचा हा खास व्हिडीओ शेअर केला आहे. दीपिकाने हा व्हिडीओ तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर रिशेअर देखील केला आहे. ऑस्करने शेअर केलेल्या व्हिडीओवर तिचा पती व बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंहने खास कमेंट



करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. "मेस्मेरिक..." असं त्याने हा व्हिडीओ पाहून म्हटलं आहे. यामध्ये दीपिकाने मस्तानी, तर रणवीरने बाजीराव पेशवे यांची भूमिका साकारली होती.दरम्यान, दीपिका पदुकोणच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर लवकरच ती रोहित शेट्टीच्या 'सिंघम अगेन' आणि प्रभासबरोबर एका नव्या चित्रपटात झळकणार आहे.

# अश्विनच्या जागी वॉशिंग्टनला संधी!

## सर्फराझ खानने राहुलला कसोटी क्रमवारीत टाकलं मागे

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात काही खेळाडूंनी चांगली कामगिरी करूनही टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला. आता रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया पुणे कसोटी जिंकून कसोटी मालिकेत पुनरागमन करण्यासाठी उत्सुक आहे. पहिल्या कसोटीतील विजयानंतर किवी संघही उत्साहात असून मालिका विजयावर त्यांच्या नजरा असतील, अशा स्थितीत टीम इंडियाला आपली प्लेइंग इलेव्हन अत्यंत काळजीपूर्वक निवडावे लागणार आहे.**





शुबमन गिल दुखापतीतून सावरला असून दुसऱ्या कसोटी सामन्यात तो तिसऱ्या क्रमांकावर खेळताना दिसण्याची शक्यता आहे. कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी केएल राहुल दुसऱ्या कसोटीत खेळणार असल्याचे संकेत दिले आहेत, या स्थितीत सर्फराझ खानला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळणार का हा मोठा प्रश्न आहे. सर्फराझने पहिल्या कसोटीत १५० धावांची शानदार खेळी केली आणि तो चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्यामुळे महत्त्वाच्या सामन्यात भारतीय संघ कोणाला संधी देणार यावर सर्वांच्या नजरा आहेत.फिरकीपटू वॉशिंग्टन सुंदरचा दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय संघात समावेश करण्यात आला. त्यामुळे त्याला दुसऱ्या कसोटी सामन्याच्या प्लेईंग इलेव्हनमध्ये स्थान मिळालं तर त्याच्या जागी कोणाला वगळले जाऊ शकते हा मोठा प्रश्न आहे. आर अश्विन सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे आणि तोही चमकदार फलंदाजी करतो, पण तरीही वॉशिंग्टन सुंदरचा फॉर्म पाहता त्याला पुन्हा संघात संधी देतील अशी चिन्हे आहेत. न्यूझीलंडची फलंदाजी पाहून सुंदरला संघात संधी देण्यात आली आहे, त्यामुळे आता जडेजा किंवा अश्विनच्या जागी सुंदरला संधी मिळण्याची शक्यता आहे. सध्या सुरू असलेल्या कसोटी सामन्यांच्या दरम्यान आयसीसीने बुधवारी नवी कसोटी क्रमवारी जाहीर केली. ज्यामध्ये भारताचा यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंतला तगडा फायदा झाला आहे. न्यूझीलंडविरुद्ध बंगळुरू कसोटीत ९९ धावांची खेळी करणाऱ्या पंतला ताज्या क्रमवारीत तीन स्थानांचा फायदा झाला आहे. यादरम्यान त्याने विराट कोहलीला मागे टाकलं आहे. पंतने कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत भारतीय फलंदाज विराट कोहलीला मागे टाकत सहाव्या स्थानी झेप घेतली आहे. या यादीत इंग्लंडचा जो रूट अव्वल स्थानी असून त्याने आपली आघाडी कायम राखली आहे. विराट आणि पंत यांच्याशिवाय भारताचा यशस्वी जैस्वाल टॉप-१० खेळाडूंमध्ये चौथ्या स्थानावर आहे.यशस्वी जैस्वाल व्यतिरिक्त, बंगळुरूमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या डावात दुहेरी आकडा गाठणारा ऋषभ पंत हा एकमेव भारतीय फलंदाज होता. ज्यामध्ये भारत अवघ्या ४६ धावांत सर्वबाद झाला होता. पंतने या डावात केवळ २० धावा केल्या होत्या, परंतु तरीही ही भारतीय डावातील सर्वोत्तम धावसंख्या ठरली.

### शॉला वगळण्याचा निर्णय

केएल राहुलचे ४९८ रेटिंग गुण आहेत. त्याचबरोबर अक्षर पटेलही याच गुणांसह आहे. भारतीय फलंदाजांच्या ताज्या आयसीसी क्रमवारीवर नजर टाकली तर रवींद्र जडेजानेही ५ स्थान गमावले आहेत. यष्टिरक्षक-फलंदाज पंत फलंदाजीला आला आणि पंतने चौथ्या दिवशी सर्फराझ खानच्या जोडीने १७७ धावांची भागीदारी रचली. या भागीदारीमुळे भारताने न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील मोठ्या धावसंख्येला प्रत्युत्तर देताना आघाडी घेतली. पंत पुन्हा एकदा नर्व्हस नाईन्टीजचा (९० आणि त्यापेक्षा अधिक धावांवर बाद होणं) बळी ठरला.

पंतने दुसऱ्या डावात ९९ धावांची उत्कृष्ट खेळी खेळली, पण केवळ एका धावेने त्याचे शतक हुकले. रवींद्र जडेजाच्या गोलंदाजीवर उजव्या गुडघ्याला दुखापत झाल्याने त्याला आदल्या दिवशी मैदानाबाहेर जावे लागले होते. पंत चालू सामन्यात दुखापतीमुळे मैदानाबाहेर गेल्यानंतर पुन्हा फलंदाजीला मैदानात येणार की नाही ही शंका होती. पण नंतर यष्टिरक्षक-फलंदाज पंत फलंदाजीला आला आणि पंतने चौथ्या दिवशी सर्फराझ खानच्या जोडीने १७७ धावांची भागीदारी रचली. या भागीदारीमुळे भारताने न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील मोठ्या धावसंख्येला प्रत्युत्तर देताना आघाडी घेतली. पंत पुन्हा एकदा नर्व्हस नाईन्टीजचा (९० आणि त्यापेक्षा अधिक धावांवर बाद होणं) बळी ठरला. यासह पंतने कसोटीतील शतकापेक्षा जास्त नर्व्हस नाईन्टीजमध्ये बाद होण्याचा विक्रम नोंदवला आहे. फलंदाजी क्रमवारीत सर्फराझ खानने १५० धावांच्या खेळीच्या जोरावर ३१ स्थानांनी झेप घेतली असून, तो आता थेट ५३व्या क्रमांकावर पोहोचला आहे. सर्फराझ खानचे ५०९ रेटिंग गुण आहेत. गुणतालिकेतील या मोठ्या उडीसह सर्फराझ खानने केएल राहुलला मागे टाकले आहे. बंगळुरू कसोटी सामन्यातील खराब कामगिरीमुळे केएल राहुल १० स्थानांनी घसरला आहे, ज्यामध्ये तो आता श्रेयस अय्यरपेक्षाही खाली ५९ व्या स्थानावर पोहोचला आहे.

# श्रेयस अय्यर दुखापतीच्या चर्चांवर भडकला

## मुंबईसाठी पुढील रणजी सामना का नाही खेळणार?

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या रणजी ट्रॉफीचे सामने खेळवले जात आहेत. यामध्ये मुंबई संघाने महाराष्ट्राचा पराभव करत पहिला रणजी सामना जिंकला, ज्यात श्रेयस अय्यरने शतक झळकावले होते. पण आता श्रेयस अय्यर दुखापतीमुळे पुढील सामन्याला मुकणार असल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू आहे. पण यादरम्यान श्रेयस अय्यरने खोटी बातमी पसरवणाऱ्यांना फटकारत एक पोस्ट एक्सवर शेअर केली.**




श्रेयस अय्यर गेल्या काही काळापासून भारतीय संघातून बाहेर आहे. यादरम्यान तो सातत्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये सक्रिय आहे. या मोसमात मुंबईसाठी तीनही देशांतर्गत सामने श्रेयस अय्यरला खेळला आहे. यात इराणी चषकाचाही समावेश आहे, ज्याचे विजेतेपद मुंबई संघाने २७ वर्षांनंतर जिंकले. अय्यरने रेस्ट ऑफ इंडिया संघाविरुद्धच्या सामन्यात ५७ आणि ८ धावा केल्या. दुखापतीमुळे श्रेयस रणजी सामन्यातील त्रिपुराविरुद्धचा सामना खेळणार नसल्याचे काही वृत्तात म्हटले आहे. पण दुखापतीबाबत केलेल्या ट्विटर श्रेयस संतापला आणि म्हणाला, "खोटी माहिती पसरवण्यापूर्वी आधी याचा नीट अभ्यास करा." त्यानंतर युजरने श्रेयसच्या दुखापतीबाबत त्याचं ट्विट डिलीट केलं आहे.श्रेयस अय्यर वैयक्तिक कारणांमुळे २६ ते २९ ऑक्टोबर दरम्यान आगरतळा येथील महाराजा बीर बिक्रम कॉलेज स्टेडियमवर त्रिपुरा विरुद्ध मुंबईच्या रणजी ट्रॉफीच्या तिसऱ्या फेरीच्या सामन्याला मुकणार आहे. उजव्या हाताच्या फलंदाजाने मुंबईच्या वरिष्ठ पुरुष निवड समितीला थोडी विश्रांती देण्याची विनंती केली होती .

### मी थोडी निराश झालो होतो

श्रेयस अय्यरने गेल्या आठवड्यात महाराष्ट्राविरुद्धच्या रणजी ट्रॉफी अ गटाच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात १४२ धावांची शानदार खेळी केली आणि मुंबईला पहिला विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली. यानंतर फलंदाजाने दावा केला होता की तो त्याच्या फिटनेसच्या बाबतीत सतत प्रगती करत आहे. शतकानंतर अय्यर म्हणाला, "खूप दिवसांनी पुनरागमन करणं खूपच खास आहे. साहजिकच, माझ्या दुखापतीमुळे मी थोडी निराश झालो होतो.